महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720

फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


---

जा.क्रं./ प्रेस नोट/291/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 20/08/2024

---

# 1)दरोडा :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 18.08.2024 रोजी चे 09.00 वा. चे सुमारास, **पंचशिल चौक सिडको येथील ज्ञानेश्वर स्टॉप घुगे जनरल स्टोअर्स सेतु सुविधा केंद्रावर सिडको ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा दुधाचे पैसे बँकेत भरणे कामी सेतु सुविधा केंद्रावर गेला असता यातील नमुद सात आरोपीतांनी अचानक येवुन फिर्यादीस मारहाण करण्यास सुरूवात केली. फिर्यादीने त्यांना मला का मारता असे म्हणताच त्यांच्या पैकी एकाने त्याचे हातातील तलवारीने थांब तुला खत्तम करतो असे म्हणुन फिर्यादीचे डोक्यात तलवार मारत असतांना फिर्यादीने तो वार हाताने अडवत असतांना फिर्यादीचे डाव्या हातावर दुखापत झाली. सदर इसमाने पुन्हा फिर्यादीस तलवारीने जिव घेणा वार केल्यावर फिर्यादी मागे सरकल्याने तलवार फिर्यादीचे छातीवर उजव्या बाजुस खरचटुन जखम झाल्याने फिर्यादी खाली बसल्यावर सदरील ईसमांनी फिर्यादीस लाथा बुक्यांनी मारहाण करून फिर्यादीचे पॅन्टचे खिशातील नगदी 4,000/–रू जबरीने चोरून घेवुन दरोडा टाकला आहे. वगैरे **फिर्यादी विश्वाभंर रावसाहेब हंबर्डे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती व दुध विक्री रा. गुंडेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 745/2024 कलम 311 भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो. नं. 90677511010** हे करीत आहेत.

# 2)जबरी चोरी :–

**अर्धापुर :–** दिनांक 19.08.2024 रोजी चे 05.15 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे मालकाचे महाराष्ट्र हॉटेलमध्ये वसमत फाटयाजवळ ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीच्या मालकाचे महाराष्ट्र हॉटेलमध्ये जावुन थम्सअप न देण्याच्या कारणावरून शांतता भंग घडुण आणण्याच्या उदेशाने फिर्यादीचा अपमान केला व फिर्यादी सोबत त्याच्या मालकास लाथा बुक्यांनी मारहाण करून हॉटेलमधील साहित्याची तोडफोड करून खाद्यपदार्थ फेकुन देवुन अंदाजे 30 हजार रूपयाचे नुकसान केले. व फिर्यादीचे मालकास हॉटेलमधील चाकु घेवुन चाकुचा धाक दाखवुन त्याच्या जवळील शर्टच्या खिशातील नगदी 8,600/–रू जबरीने चोरून घेतले. त्यानंतर फिर्यादी घाबरून हॉटेलच्या मागे गेला असता त्याच्याजवळ जावुन फिर्यादीस आरोपीने त्याच्या जवळील चाकुने फिर्यादीच्या उजव्या हातावर मारहाण केली. वगैरे **फिर्यादी वैजनाथ किशनराव गोलकोंडे, वय 49 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सापनाथ ता. कळमनुरी जि. हिंगोली ह. मु. महाराष्ट्र हॉटेल वसमत फाटा ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 447/2024 कलम 309(6),324(4), 352, 3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ श्री भोसले, मो. नं. 9890595618** हे करीत आहेत.

# 3)मोबाईल चोरी :–

**माहुर :–** दिनांक 19.08.2024 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **दत्त शिखर पायथा बसस्थानक माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने पंचक्रोशी परिक्रमा यात्रा निमित्त दर्शनाकरीता आलेले भावी हे दत्तशिखर पायथा बसस्थानक येथुन बसमध्ये चढत असतांना गर्दीचा फायदा घेवुन त्यांचे खिशातुन दहा मोबाईल किंमती 50,000/–रू चे चोरून घेतलेले बॅगसह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1326 गजानन रामदास चौधरी, ने. पोस्टे माहुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 111/2024 कलम 303(2), भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री जाधव, मो.नं. 7887687478** हे करीत आहेत.

# 4)अवैध रेती चोरी :-

**1)देगलुर :-** दिनांक 19.08.2024 रोजी चे 11.20 वा. चे सुमारास, **अंतापुर ते देगलुर जाणारे रोडवर अंतापुर शिवार ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशीर अशोक लिलँड कंपणीचा टिपर क्रं. टीएस-07/युजे-0444 किंमती 30,00,000/-रू मध्ये सात ब्रास रेती किंमती 60,000/-रूपयाची रेतीची चोरटी विक्री करण्याचे उदेशाने एकुण 30,60,000/-रू चा मुद्येमालासह वाहतुक करीत असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/278 शिवाजी शंकरराव आडंबे, ने पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 399/2024 कलम 303(2), भारतीय न्याय संहीता-2023 कायदा सह कलम 48(7) म.ज.म. अधि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**2462 केंद्रे, मो.नं. 9923692462** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :-** दिनांक 19.08.2024 रोजी चे 05.15 वा. चे सुमारास, **गाडेगाव रोड मील्लतनगर कांदा मार्केट ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशीर टाटा कंपणीचा 407 टेम्पो क्रं. एमएच-43/एफ-7037 किंमती 1,50,000/-रू मध्ये एक ब्रास रेती किंमती 3,000/-रूपयाची रेतीची चोरटी विक्री करण्याचे उदेशाने एकुण 1,53,000/-रू चा मुद्येमालासह वाहतुक करीत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री परमेश्वर जळबाजी कदम, ने पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 746/2024 कलम 303(2), भारतीय न्याय संहीता-2023 कायदा सह कलम 48(7),(8), म.ज.म. अधि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2441 मोरे, मो.नं. 8208062971** हे करीत आहेत.

# 5)आत्महत्येस प्रवृत्त केले :-

**माळाकोळी :-** दिनांक 28.11.2024 रोजी चे 08.00 वा. चे पुर्वी, **मयताचे राहाते घरी प्रॉपर माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून यातील **मयत नामे आरती बालाजी शिंदे, वय 22 वर्षे रा. माळाकोळी** हीस प्लॉट घेण्यासाठी पाच लाख रूपये घेऊन ये नाहीतर तुला जिवंत मारतो अशी धमकी देवुन पैशाची मागणी करून तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. त्या त्रासाला कंटाळुन मयताने तिचे राहाते घरी छताचे पंख्याला ओढणीने गळफास घेवुन आत्महत्या केली असुन यातील नमुद आरोपीतांनी आत्महत्येस प्रवृत केले. वगैरे **फिर्यादी नागनाथ विश्वनाथ गवळे, वय 60 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त माजी सैनिक रा. समतानगर डॅमरोड उदगीर जि. लातुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 190/2024 कलम 85, 80, 108, 351,(2),3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोउपनि/**श्रीमती भोंडवे मॅडम, मो.क्रं. 8605249286** हे करीत आहेत.

# 6)विवाहीतेचा छळ :-

**1)विमानतळ :-** दिनांक 09.02.2019 ते दिनांक 13.07.2024 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी बीड बायपास, कासलीवाल मारवेल, छत्रपती संभाजीनगर व माहेर कॉलनी बजरंग कॉलनी नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादी बाईस तुझे वडिलाची शेती बाडी विकुन 25,00,000/-रू घेवुन ये असे म्हणुन थापडा बुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ करून सासरी व माहेरी असतांना शारिरीक व माणसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 26 वर्षीय महीला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 326/2024 कलम 85, 115(2), 352,351,(2), 3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2609 अक्कमवाड, मो.क्रं. 9356438258** हे करीत आहेत.

**2)नायगांव :-** सन 2019 ते 2021 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी चव्हाण गल्ली नायगांव ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला स्वयपांक चांगला करता येत नाही, तुला बिमारी आहे. तुला इथे राहायचे असेल तर शेतात बोर मारण्यासाठी तु तुझ्या माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. व पहिली पत्नी असतांना दुसरे लग्न केले. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महीला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरनं 210/2024 कलम 498(अ), 494, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/941 चरकुलवार, मो.क्रं. 7030128029** हे करीत आहेत.

# 7)प्राण्यांस क्रुरतेने वागणुक :-

**हदगाव :-** दिनांक 19.08.2024 रोजी चे 05.05 वा. चे सुमारास, **जुना पुल टायरबोर्ड ते देगलुर नाकाकडे जाणारे सार्वजनिक रोडवर पॉपुलर बेकरी जवळ नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या गोवंश जातीचे दोन बैल किंमती 65,000/-रूपयाचे अशोक लिलँड कंपणीचा पिकअप वाहन क्रमांक एमएच-27/एक्स-8875 किंमती 3,00,000/-रू मध्ये दाटीवाटी बांधुन, क्रुर वागणुक देवुन वाहतुक करीत असतांना 3,65,000/-रू चे मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/देविदास बापुराव बिसाडे, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरन 320/2024 कलम 5, 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम 11(1)(ई), 11(ई) प्राणी छळ प्रतिबंध कायादा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1988 मानेकर,** मो.क्रं. 9767002111 हे करीत आहेत.

## 8)कोपटा ॲक्ट :–

**किनवट :–** दिनांक 18.08.2024 रोजी चे 17.20 वा. चे सुमारास, **खैरदिन मार्ग किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले पान टपरीवर, सहारा किराणा दुकानात तंबाखुजन्य पदार्थ उत्पादन एकुण 30,439/–रूपये किंमतीचा मुद्येमाल चोरटी विक्री करण्याकरीता ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री वसंत हुसेन कनाके, ने. सी–47 किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 244/2024 कलम 6, 24, 20 कोपटा ॲक्ट कायादा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 वाडगुरे,** मो.क्रं. 8805981062 हे करीत आहेत.

## 9)जुगार :–

**1)हदगांव :–**दिनांक 19.08.2024 रोजी चे 22.50 वा. चे सुमारास, **मौ. चिंचोली शिवारात बापुराव पोळ यांचे शेतात ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना अंदर बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 2,69,240/–रूपयेचे मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री उमेश गौतम रायबोळे, ने. पोस्टे हदगांव** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे हदगांव** गुरनं 246/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2817 मुंडीक, मो.नं. 7774032817** हे करीत आहेत.

**2)लोहा :–**दिनांक 19.08.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **लोहा ते कंधार जाणारे रोड लगत व्यंकटराव गोविंदराव पवार यांचे शेतातील आखाडयावर मोकळया जागेत लिंबाचे झाडा खाली लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना हार जित नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 2,03,360/–रूपयाचे मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2127 बालाजी पांडुरंग लाडेकर, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे लोहा** गुरनं 297/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2354 भाडेकर, मो.नं. 8888865814** हे करीत आहेत.

**3)विमानतळ :–**दिनांक 19.08.2024 रोजी चे 15.25 वा. चे सुमारास, **विमानतळ रोडवर चिकण दुकानाचे पाठीमागे सिध्दार्थनगरचे पाटीचे जवळ सार्वजनिक जागेत नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1810/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/67 ज्ञानेश्वर भगवानराव भिसे, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे विमानतळ** गुरनं 325/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1334 जाधव, मो.नं. 9923078806** हे करीत आहेत.

## 10)प्रोव्हिबीशन :–

**1)उमरी :–**दिनांक 19.08.2024 रोजी चे 19.20 वा. चे सुमारास, **आपला साई धाब्यावर रामखडक शिवार ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू किंमती 1400/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सचिन मुकूंदराव आरमाळ, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 288/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2018 वडजे, मो.नं. 9765770159** हे करीत आहेत.

**2)उमरी :–**दिनांक 19.08.2024 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे टीन पत्र्याच्या घरामध्ये बोथी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिंधी किंमती 1750/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सचिन मुकूंदराव आरमाळ, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 289/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2018 वडजे, मो.नं. 9765770159** हे करीत आहेत.


**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 292 ⁄ 2024 दिनांक : 20.08.2024

**नांदेड शहरात पोलीसांकडून ऑल आऊट ऑपरेशनमध्ये केलेली कामगिरी...**

नांदेड शहरात घडत असलेल्या गुन्हयांना आळा बसणेकामी मा. पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार यांचे आदेशाने **Operation flush out** राबविण्यात येत असुन त्या अनुषंगाने दिनांक 19/08/2024 चे 22.00 ते 20/08/2024 चे 04.00 वाजे पावेतो नांदेड शहरातील पोलीस स्टेशन हद्दीमध्ये ऑल आऊट ऑपरेशनचे आयोजन करण्यात आलेले होते.

सदर ऑलआऊट ऑपरेशनमध्ये नांदेड शहरातील वजिराबाद, शिवाजीनगर, भाग्यनगर, विमानतळ, इतवारा व नांदेड ग्रामीण हद्दीत राबविण्यात आलेले आहे. ऑलआऊट ऑपरेशनकामी 02 अपर पोलीस अधीक्षक, 02 उपविभागीय पोलीस अधीकारी, 28 इतर पोलीस अधिकारी व 143 पोलीस अंमलदार, 02 आरसीपी प्लाटुन यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सदर ऑलआऊट ऑपरेशनमध्ये नाकाबंदी करुन संशयीत वाहन चेक करणे, पाहिजे फरारी आरोपी यांचा शोध घेवुन अटक करणे, सर्वप्रकारचे वॉरंट बजावणे, गंभीर गुन्हयातील आरोपीतांना चेक करणे, सराईत गुन्हेगार चेक करणे, या बाबत आदेशीत करण्यात आले होते. त्या अनुषंगाने नांदेड शहरातील पोलीस स्टेशन हद्दीमधील अग्नीशस्त्र वापरुन गुन्हे करणारे (47), मालाविषयक गुन्हयातील (58) आरोपींना चेक करण्यात आलेले आहे. तसेच (13) इसमांना वॉरंट तामील करण्यात आलेले असून पो.स्टे. हद्दीतील महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदी करुन (266) संशयीत वाहने चेक करण्यात आलेले आहेत.

तसेच सदर ऑलआऊट दरम्यान मा. पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी कलम 55 म.पो.का.प्रमाणे सहा महिन्यांसाठी नांदेड जिल्हयातून हद्दपार केलेले इसम नामे 1. राजु माधवराव केंद्रे, वय 47 वर्ष, रा. शेल्लाळी ता.कंधार जि. नांदेड 2. सत्यम राजु केंद्रे, वय 22 वर्ष, रा. शेल्लाळी ता.कंधार जि. नांदेड यांना स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील सपोनि संकेत दिघे यांचे पथकाने पो.स्टे. भाग्यनगर हद्दीत ताब्यात घेवून त्यांचेविरुध्द कलम 142 महाराष्ट्र पोलीस कायदाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच पोस्टे इतवारा यांनी त्यांच्या हद्दीतील एका आरोपीस ताब्यात घेवुन त्याचेकडुन 01 खंजर जप्त करुन आर्मस ॲक्टची कार्यवाही केली आहे.

सदरची कामगीरी ही मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड, मा. श्री खंडेराय धरणे, अपर पोलीस अधीक्षक भोकर, मा. श्री सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड